# प्रकरण-१० : सामान्यरूप

## सामान्यरूप :-

नामाला किंवा सर्वनामाला विभक्तीचे प्रत्यय लावण्यापूर्वी त्यांच्या मुळ रूपात जो बदल होतो त्याला सामान्यरूप असे म्हणतात.

उदा.,

| | विभक्ती प्रत्यययुक्त शब्द | मुळ शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|---|
| १). | शिक्षकांनी | शिक्षक | शिक्षकां | नी |
| २). | घराजवळ | घर | घरा | जवळ (श-अ) |
| ३). | उंदराशी | उंदीर | उंदरा | शी |
| ४). | घोड्याला | घोडा | घोड्या | ला |

## ☆ सामान्यरूपाचे प्रकार :-

### अ). पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप :-

१). 'अ'चे 'आ' :-

अकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप आकारान्त होते.

उदा.,
वर्ग - वर्गात
काळ - काळात
काम - कामाला
खांब - खांबाला
निर्णय - निर्णया-ने

२). 'आ'चे 'या' :-

आकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.

उदा.,
घोडा - घोड्या-च्या
कोयता - कोयत्या-ने
दोरा - दोऱ्या-ला

अपवाद :- आजोबा दादा, काका, नाना, राजा, चहा इत्यादी.

Page No. :
Date : / /

३). 'ई' चे 'या' :-
ईकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.
उदा., धोबी - धोब्या-ला
तेली - तेल्या-ने
माळी - माळ्या-चा

अपवाद :- भटजी, हत्ती, नंदी, काजी, पंतोजी, मुनी, ऋषी इत्यादी

४). दीर्घातांचे दीर्घातच :-
खालील नामांचे सामान्यरूप आहे तसेच दीर्घांत लिहावे.
उदा., कवी - कवीला
साधु - साधुच्या
निती - नितीच्या

५). 'ऊ' चे 'वा' :-
ऊकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप वाकारान्त होते.
उदा., भाऊ - भावाला
लाडू - लाडवाच्या
जातू - जातवाच्या

पेरू, चारू, खडू, शत्रू, खेळाडू, पशू इत्यादी.

६). 'ए' चे 'या'
एकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.
उदा., फडके - फडक्यांना, सोने - सोन्याला
दुधभाते - दुधभात्याला, मोरे - मोऱ्याला

७). 'ओ' चे 'ओ' :-
ओकारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप ओकारान्तच होते.
उदा., किलो - किलोस
धनको - धनकोचा

Page No. :
Date : / /

## ब). स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप :-

① ①. 'अ'चे 'ए' / 'आ' :-

आकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात एकारान्त व अनेकवचनात आकारान्त होते.

उदा., वीट - विटेला - विटांना
जीभ - जिभेला - जिभांनी

② 'अ' चे 'ई' :-

अकारान्त स्त्रिलिंगी नामाचे सामान्यरूप ईकारान्त होते.

उदा:- भिंत - भिंतीला
विहीर - विहीरीत

२). 'आ' चे 'ए' :-

आकारान्त स्त्रिलींगी नामाचे सामान्यरूप एकारान्त होते.

उदा., शाळा - शाळेत
भाषा - भाषेचा
माता - मातेला

३). 'ई' चे 'ई' / 'या' :-

ईकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात ईकारान्त व अनेकवचनात ई / याकारान्त होते.

उदा., नदी - नदीला - नद्यांचा
दासी - दासीला - दासींचा.

४). 'ऊ' चे 'वा' :-

ऊकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप होत नाही, क्वचित प्रसंगी ते वाकारान्त होते.

उदा.,

काकू - काकूला
वधू - वधूचा
सासू - सासूला - सासवांना

५). 'ओ'चे 'आ' :-
ओकारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप अनेकवचनात आकारान्त होते.
उदा., बायको - बायकांना.

## क). नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप :-

१). 'अ' चे 'आ' :-
अकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप आकारान्त होते.
उदा., फूल - फुलांत
पान - पानाच्या
मूल - मुलाने

२). 'ई' चे 'या' :-
ईकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.
उदा., पाणी - पाण्यात
लोणी - लोण्याच्या
मोती - मोत्याच्या

३). ① 'ऊ' चे 'आ' :-
ऊकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप आकारान्त होते.
उदा., लिंबू - लिंबाच्या
कोकरू - कोकराने
लेकरू - लेकराला

② 'ऊ' चे 'वा' :-
ऊकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप वाकारान्त होते.
उदा., कुंकू - कुंकवाच्या
गळू - गळवाच्या
आसू - आसवाने.

Page No. :
Date : / /

४). 'ए' चे 'या' :-
एकारान्त नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप याकारान्त होते.
उदा., तळे - तळ्यात
केळे - केळ्यांची
नाणे - नाण्यांचा

★ विशेषणांच्या सामान्यरूपाचे प्रकार :-

१). 'अ', 'ई', 'ऊ' चे सामान्यरूप होत नाही.
अकारान्त, ईकारान्त, ऊकारान्त या विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.
उदा., गरीब माणसांना
भोकरी कपड्यांचे दुकान
कडू कारल्याची भाजी

२). विभक्ती :-
विभक्ती प्रत्यय लागलेल्या नामांच्या आकारान्त व ईकारान्त विशेषणांचे सामान्यरूप याकारान्त होते.
उदा., भला माणूस
भल्या माणसाने
खरी गोष्ट - खऱ्या गोष्टीशी

सामान्यरूप केव्हा होत नाही.

एकाक्षरी शब्दाचे सामान्यरूप होत नाही.

अ च्या शेतात विहिर आहे.

परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरूप केव्हा केव्हा होत नाही.

मला शेक्सपियरची नाटके आवडतात.

ग्रामवाचक किंवा देशवाचक शब्दांचे सामान्यरूप चतुर्थीचा च व सप्तमीचा त लावल्यास होते इतर प्रत्यय लावल्यास सामान्यरूप होत नाही.

उदा., नागपूर - नागपुरास - नागपुरात - नागपूरला

हिंदुस्थान - हिंदुस्थानास - हिंदुस्थानात - हिंदुस्थानला